## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी
## गट – क व गट – ड संवर्गातील पदभरतीसाठी जाहिरात क्रमांक ०१ सन २०१५

महाराष्ट्र शासनाने रत्नागिरी सा.बां.मंडळास दिलेल्या प्राधिकारानुसार खालील संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी विहित शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांकडून सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, रत्नागिरी हे सा.बां.मंडळ, रत्नागिरी यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी खाली दिलेल्या संवर्गाकरिता केवळ ऑनालाईल पध्दतीने अर्ज मागविण्यांत येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा maharecruitment.mahaonline.gov.in

या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.mahapwd.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

❖ <u>परिक्षेचे वेळापत्रक</u>

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईल पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक २९/०४/२०१५ (सकाळी १२.०० पासून ते दिनांक १३/०५/२०१५ (रात्रौ २३.५९ वाजे पर्यंत) |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्यानंतर तयार होणा-या चलनाद्वारे परिक्षा शुल्क स्विकृतीचा अंतिम दिनांक | दिनांक १४/०५/२०१५ |

भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल वगैरे सूचना maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून, या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

सरळसेवा भरती प्रक्रीया ३ विभागात केली जाणार आहे. १) सदस्य सचिव, तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, रत्नागिरी, २) सदस्य सचिव, तथा उप-कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, उत्तर रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी, ३) सदस्य सचिव, तथा उप-कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग. सदरच्या विभागांमधील पदांसाठी, उमेदवारांनी इच्छुक पदाकरीता सरळसेवा भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने त्या त्या विभागाच्या नावे अर्ज करावयाचा आहे.

## पदभरती करीता विभागनिहाय पदांचा तपशिल खालील प्रमाणे

### ➢ विभाग-१ :- सदस्य सचिव, तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, रत्नागिरी., सरळसेवा गट-क व गट-ड पदांचा तपशिल.

**विभाग :- १ - गट-क - अनुक्रमांक - १ - कनिष्ठ लिपीक**
**वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९००/-**
**उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे १५)**

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महिला | |
| १ | अनुसुचित जाती | ४ | १ | १ | २ |
| २ | अनुसुचित जमाती | ४ | ० | १ | ३ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | १ | ० | ० | १ |
| ४ | भटक्या जाती (ब) | १ | ० | १ | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ३ | ० | १ | २ |
| ९ | खुला | २ | ० | १ | १ |
| | एकूण | १५ | १ | ५ | ९ |

टिप :- उपरोक्त कनिष्ठ लिपीक पदांपैकी १ पद अपंगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. विचाराधीन पदांकरीता शासन
सामान्य प्रशासन विभाग निणर्य क्रमांक संकीर्ण १०१०/प्र.क्र./८९०/१९ मत्रालय मुंबई दिनांक १० जानेवारी २०११
चे निर्णयास आधिन राहून अंतिम निवड करण्यात येईल.

**विभाग :- १ - गट-क - अनुक्रमांक - २ - सहाय्यक भांडारपाल**
**वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९००/-**
**उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे ३)**

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | १ | ० | १ |
| २ | अनुसुचित जमाती | १ | ० | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | खुला | १ | ० | १ |
| | एकूण | ३ | ० | ३ |

विभाग :- १ - गट-क - अनुक्रमांक - ३ - आरक्षण लिपीक
वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे १)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | १ | ० | १ |
| २ | अनुसुचित जमाती | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | ० | ० | ० |
| | एकूण | १ | ० | १ |

टिप :- उपरोक्त आरक्षणामध्ये आरक्षण लिपीकासाठी सर्वसाधारण उमेदवारांबरोबर अपंगातील फक्त अस्थिव्यंग उमेदवारही अर्ज करु शकतील. शासन समान्य प्रशासन विभाग निणर्य क्रमांक संर्कीर्ण १०१०/प्र.क्र./८९०/१९
मत्रालय मुंबई दिनांक १० जानेवारी २०११ चे निर्णयास आधिन राहून अंतिम निवड करण्यात येईल.

विभाग :- १ - गट-क - अनुक्रमांक - ४ – दूरध्वनी चालक
वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२,०००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे ६)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| | | | महिला | |
| १ | अनुसुचित जाती | १ | ० | १ |
| २ | अनुसुचित जमाती | १ | ० | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | १ | ० | १ |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | ३ | १ | २ |
| | एकूण | ६ | १ | ५ |

टिप :- उपरोक्त दुरध्वनी चालक पदांपैकी १ पद फक्त अस्थिव्यंग उमेदवांरासाठी राखीव ठेवण्यात आले आहे.
विचाराधीन पदांकरीता शासन सामान्य प्रशासन विभाग निणर्य क्रमांक संर्कीर्ण १०१०/प्र.क्र./८९०/१९ मत्रालय
मुंबई दिनांक १० जानेवारी २०११ चे निर्णयास आधिन राहून अंतिम निवड करण्यात येईल.

➢ गट ड मधील उपलब्ध पदांसाठी आरक्षण

विभाग :- १ - गट-ड - अनुक्रमांक - १ – शिपाई

वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००/-

उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे ६)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | १ | ० | १ |
| २ | अनुसुचित जमाती | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती (अ) | २ | ० | २ |
| ४ | भटक्या जाती (ब) | १ | ० | १ |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | १ | ० | १ |
| | एकूण | ५ | ० | ५ |

विभाग :- १ - गट-ड - अनुक्रमांक - २ – टपाली

वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००/-

उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे १)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | १ | ० | १ |
| २ | अनुसुचित जमाती | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | ० | ० | ० |
| | एकूण | १ | ० | १ |

विभाग :- १ - गट-ड - अनुक्रमांक - ३ – बंगला चौकीदार

वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००/-

उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे १५)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | २ | ० | २ |
| २ | अनुसुचित जमाती | ३ | ० | ३ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | १ | ० | १ |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | १ | ० | १ |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ३ | ० | ३ |
| ९ | खुला | ५ | ० | ५ |
| | एकूण | १५ | ० | १५ |

विभाग :- १ - गट-ड - अनुक्रमांक - ४ – कक्षसेवक

वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००/-

उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे ४)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | ३ | ० | ३ |
| २ | अनुसुचित जमाती | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | १ | ० | १ |
| | एकूण | ४ | ० | ४ |

विभाग :- १ - गट-ड - अनुक्रमांक - ५ – खानसामा

वेतनश्रेणी – ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१,८००/-

उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे १५)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल माजीसैनिक | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | २ | ० | २ |
| २ | अनुसुचित जमाती | ३ | ० | ३ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | १ | ० | १ |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | १ | ० | १ |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | ८ | १ | ७ |
| | एकूण | १५ | १ | १४ |

विभाग :- १ - गट-ड - अनुक्रमांक - ६ – प्रयोगशाळा परिचर

वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१३००/-

उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे १)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल माजीसैनिक | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | ० | ० | ० |
| २ | अनुसुचित जमाती | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | १ | ० | १ |
| | एकूण | १ | ० | १ |

➢ विभाग-२ :- सदस्य सचिव, तथा उप-कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, उत्तर रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी.
सरळसेवा गट-ड पदांचा तपशिल.

विभाग :- २ - गट-ड - अनुक्रमांक - १ – मदतनीस
वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१,३००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे २)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | ० | ० | ० |
| २ | अनुसुचित जमाती | १ | ० | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | १ | ० | १ |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | ० | ० | ० |
| | एकूण | २ | ० | २ |

विभाग :- २ - गट-ड - अनुक्रमांक - २ – सफाई कामगार
वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१,३००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे ७)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल महिला | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | १ | ० | १ |
| २ | अनुसुचित जमाती | २ | ० | २ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | १ | ० | १ |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | ३ | २ | १ |
| | एकूण | ७ | २ | ५ |

विभाग :- २ - गट-ड - अनुक्रमांक - ३ – मैलमजूर
वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१,३००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे १०४)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | | | | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | स्वातंत्र सैनिक | प्रकल्प/ भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | |
| १ | अनुसुचित जाती | १४ | २ | ० | १ | ४ | १ | ६ |
| २ | अनुसुचित जमाती | २० | ३ | ० | २ | ६ | २ | ७ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ८ | २ | ० | ० | २ | ० | ४ |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ५ | १ | ० | ० | २ | ० | २ |
| ६ | भटक्या जाती (ड) | ५ | २ | ० | ० | २ | ० | १ |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ४ | १ | ० | ० | २ | ० | १ |
| ८ | इतर मागास वर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | खुला | ४८ | ७ | १ | २ | १४ | २ | २२ |
| | एकूण | १०४ | १८ | १ | ५ | ३२ | ५ | ४३ |

➢ **विभाग-३ :- सदस्य सचिव, तथा उप-कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कुडाळ मु.कणकवली, जिल्हा सिंधुदूर्ग.**
**सरळसेवा गट-ड पदांचा तपशिल.**

विभाग :- ३ - गट-ड - अनुक्रमांक - १ – मदतनीस
वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१,३००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे २)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | ० | ० | ० |
| २ | अनुसुचित जमाती | १ | ० | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | १ | ० | १ |
| | एकूण | २ | ० | २ |

विभाग :- ३ - गट-ड - अनुक्रमांक - २ — सफाई कामगार
वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१,३००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे ४)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल महिला | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | ० | ० | ० |
| २ | अनुसुचित जमाती | १ | ० | १ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जाती (ब) | ० | ० | ० |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जाती (ड) | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० |
| ९ | खुला | ३ | २ | १ |
| | एकूण | ४ | २ | २ |

विभाग :- ३ - गट-ड - अनुक्रमांक - ३ — मैलमजूर
वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु.१,३००/-
उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे ६६)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | एकूण भरावयाची पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | | | | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | स्वातंत्र सैनिक | प्रकल्प/ भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | |
| १ | अनुसुचित जाती | ९ | १ | ० | १ | ३ | १ | ३ |
| २ | अनुसुचित जमाती | १२ | २ | ० | ० | ४ | ० | ६ |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ५ | १ | ० | ० | २ | ० | २ |
| ४ | भटक्या जाती (ब) | ५ | ० | ० | ० | २ | ० | ३ |
| ५ | भटक्या जाती (क) | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ६ | भटक्या जाती (ड) | ४ | ० | ० | ० | २ | ० | २ |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | ४ | ० | ० | ० | २ | ० | २ |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ४ | १ | ० | ० | १ | ० | २ |
| ९ | खुला | २२ | ३ | ० | १ | ७ | ० | ११ |

| | एकूण | ६६ | ८ | ० | २ | २३ | १ | ३२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

**टिप :- वर नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.**

- **स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, रत्नागिरी सा.बां.मंडळ, रत्नागिरी यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील सामाजिक आरक्षणामधील पात्र उमेदवारांचा शासन विहीत नियमानुसार विचार केला जाईल.**

- **पदभरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, रत्नागिरी सा.बां.मंडळ, रत्नागिरी यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.**

- ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नावे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदांसाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वतंत्ररित्या अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.सदर जाहिरात उपरोक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावरुन प्रसिध्द करण्यासाठी संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात आली आहे.

- उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने, अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहिल. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपूर्वक/ विचारपुर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

- **शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ दिनांक ०५.०६.२०१४ नुसार गट-क मधिल कोणत्याही पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नसल्याने, भरती प्रक्रीयेत पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व गट-ड साठी लेखी परीक्षा घेण्यात येईल, त्या परिक्षांमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड करण्यात येईल. अशा उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाचे प्रतिसोबत हॉल टिकीट व शैक्षणिक व इतर संबंधातील मुळ प्रमाणपत्रे व सत्यप्रतिंचा संच इ. कागदपत्रे तपासणी करीता कागदपत्रे पडताळणी समितीकडे उपलब्ध करून दयावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.**

- **लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर निवड केलेल्या उमेदवारांनी खालील प्रमाणे मूळ कागदपत्र व सत्यप्रती अर्जासोबत सादर कराव्यात.**

**शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे/ गुणपत्रके**

2) जन्मदिनांकसाठी पुराव्यादाखल प्रमाणपत्र
3) जातीचे प्रमाणपत्र
4) जात वैधता प्रमाणपत्र
5) उन्नत/ प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१४-१५ साठी वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.
6) कुटुंब मर्यादित असल्याबाबत प्रतिज्ञापत्र शासन निर्णय दिनांक २८/०५/२००५ नुसार.
7) अपंग असलेबाबत सक्षम प्राधिकायाचा दाखला.
8) खेळाडूसाठी राष्ट्रीय/ राज्यस्तर/ आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पारितोषिक बाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.
9) माजी सैनिक असल्याबाबतचा सक्षम प्राधिकायांचा दाखला.
10) अनुभव प्रमाणपत्र.
11) परीक्षा शुल्क जमा केल्याबाबतची पावती.
12) अर्जावर लावलेल्या छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती प्रवेशपत्रासाठी.
13) उमेदवाराने अंशकालीन कर्मचारी म्हणून काम केले असल्यास सेवायोजन अधिकायांचा दाखला.
14) शासकीय/ निमशासकीय कर्मचारी असल्यास त्याचे कार्यालयीन परवानगीची प्रत.
15) प्रकल्पग्रस्त असल्यास प्रकल्पग्रस्त असलेबाबतचा सक्षम प्राधिकायाचा दाखला.
16) भूकंपग्रस्त असल्यास भूकंपग्रस्त असलेबाबतचा सक्षम प्राधिकायाचा दाखला.
17) संगणक अर्हतेबाबतचा दाखला.
18) स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य/१९९१ चे जनगणना कर्मचारी/ १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी असल्यास पुराव्यादाखल अभिलेख.
19) डोमिसाईल प्रमाणपत्र.
20) उमेदवार भारतीय नागरीक असावा.

❖ पात्रता :-

➢ विभाग – १ - गट क मधील पदे

| अ. क्र. | पदनाम | वय | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता | इतर अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | १८ ते ३३ | १.माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एसएससी) अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य म्हणून जाहिर केलेली अर्हता धारण केलेला असावा.<br>२. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट किंवा मराठी ३० शब्द प्रति मिनीट आवश्यक आहे. | १.शासन निर्णय क्र.मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/ ३९, दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून २ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.<br>२. भाषा परिक्षा, शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी ) मराठी व हिंदीसह उत्तीर्ण किंवा एतदर्थ मंडळाची परिक्षा नियुक्तीपासून ६ महिन्याच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक. |
| २ | सहाय्यक भांडारपाल | १८ ते ३३ | १. माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एसएससी) अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य | १.शासन निर्णय क्र.मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/ ३९, दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | म्हणून जाहिर केलेली अर्हता धारण केलेला असावा.<br>२. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट किंवा मराठी ३० शब्द प्रति मिनीट आवश्यक आहे.<br>३. भांडार शाखेतील कामकाजाचा<br>तीन वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक. | तंत्रज्ञान विषयक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून २ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.<br>२. भाषा परिक्षा, शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी ) मराठी व हिंदीसह उत्तीर्ण किंवा एतदर्थ मंडळाची परिक्षा नियुक्तीपासून ६ महिन्याच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक. |

| अ. क्र. | पदनाम | वय | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता | इतर अर्हता |
|---|---|---|---|---|
| ३ | आरक्षण लिपीक | १८ ते ३३ | १. माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एसएससी) अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य म्हणून जाहिर केलेली अर्हता धारण केलेला असावा.<br>२. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट किंवा मराठी ३० शब्द प्रति मिनीट आवश्यक आहे.<br>३. मराठी व हिंदी भाषा बोलता वाचता येणे आवश्यक. | १.शासन निर्णय क्र.मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/ ३९, दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून २ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.<br>२. भाषा परिक्षा, शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी ) मराठी व हिंदीसह उत्तीर्ण किंवा एतदर्थ मंडळाची परिक्षा नियुक्तीपासून ६ महिन्याच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक. |
| ४ | दूरध्वनी चालक | १८ ते ३३ | १. माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एसएससी) अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य म्हणून जाहिर केलेली अर्हता धारण केलेला असावा.<br>२. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट किंवा मराठी ३० शब्द प्रति मिनीट आवश्यक आहे.<br>३. टेलिफोन ऑपरेटर कोर्स परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र वा टेलिफोन ऑपरेटर कामाचा अनुभवाचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य.<br>४. मराठी व हिंदी भाषा बोलता वाचता येणे आवश्यक. | १. शासन निर्णय क्र.मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/ ३९, दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून २ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.<br>२. भाषा परिक्षा, शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी ) मराठी व हिंदीसह उत्तीर्ण किंवा एतदर्थ मंडळाची परिक्षा नियुक्तीपासून ६ महिन्याच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक. |

- विभाग – १ - गट ड मधील पदे :-

| अ.क्र. | पदनाम | वय | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता | इतर अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | शिपाई | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | -- |
| २ | टपाली | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | |
| ३ | बंगला चौकीदार | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | |

| अ.क्र. | पदनाम | वय | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता | इतर अर्हता |
|---|---|---|---|---|
| ४ | कक्षसेवक | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | |
| ५ | खानसामा | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक.<br>३. शाकाहारी व मांसाहारी पदार्थ बनविण्याचा उपहारगृहे, खानपान किंवा खानावळी येथील कामाचा ३ वर्षाचा अनुभव. | |
| ६ | प्रयोगशाळा परिचर | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | |

➢ विभाग – २ - गट ड मधील पदे :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मदतनीस | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | -- |
| २ | सफाई कामगार | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | |
| ३ | मैलमजूर | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | |

➢ विभाग – ३ - गट ड मधील पदे :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मदतनीस | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | -- |
| २ | सफाई कामगार | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | -- |
| ३ | मैलमजूर | १८ ते ३३ | १. किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक.<br>२. शारिरिक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक. | -- |

❖ वयोमर्यादेतील सवलत :-

१. दिनांक ३०/०४/२०१५ रोजी खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्षे व मागास प्रवर्गासाठी ३८ वर्षे पेक्षा जास्त नसावे.
२. मागासवर्गीय उमेदवार :- ३८ वर्षे
३. अपंग/प्रकल्पग्रस्त/अपंग माजी सैनिक/भूकंपग्रस्त/स्वतंत्र सैनिक निर्देशित पाल्य /१९९१ चे जनगणना कर्मचारी व
१९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी /शासकीय कर्मचारी - ४५ वर्ष.
४. खेळाडू ५ वर्ष सवलत ( खुला प्रवर्ग ३३ + ५, मागासप्रवर्ग ३८ + ५)

५. अंशकालीन उमेदवार : ४६ वर्षे.

❖ **शासकीय सेवेमध्ये भरती झाल्यास होणारी उपलब्धी**

विभाग – १- गट -क

| अ क्र | पदनाम | वेतनश्रेणी | वेतन अंदाजित(रु) | पदोन्नतीच्या संधी |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | (पीबी.२) ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | अधीक्षक पदापर्यंत |
| २ | सहाय्यक भांडारपाल | (पीबी.२) ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | भांडारपाल पदापर्यंत |
| ३ | आरक्षण लिपीक | (पीबी.२) ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | एकाकी पद |
| ४ | दूरध्वनी चालक | (पीबी.२) ५२००-२०२०० ग्रेड वेतन २००० | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | एकाकी पद |

विभाग – १ - गट -ड

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | वेतन अंदाजित(रु) | पदोन्नतीच्या संधी |
|---|---|---|---|---|
| १ | शिपाई | (१-एस)४४००-७४४० ग्रेड वेतन १३०० | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | नाईक पदापर्यंत |
| २ | टपाली | (१-एस)४४००-७४४० ग्रेड वेतन १३०० | मुळ वेतन+महागाई भत्ता+इतर भत्ते | एकाकी पद |
| ३ | बंगला चौकीदार | (१-एस)४४००-७४४० ग्रेड वेतन १३०० | मुळ वेतन+महागाई भत्ता+इतर भत्ते | एकाकी पद |
| ४ | कक्षसेवक | (१-एस)४४००-७४४० ग्रेड वेतन १३०० | मुळ वेतन+महागाई भत्ता+इतर भत्ते | एकाकी पद |
| ५ | खानसामा | (१-एस)५२००-२०२०० ग्रेड वेतन १८०० | मुळ वेतन+महागाई भत्ता+इतर भत्ते | एकाकी पद |
| ६ | प्रयोगशाळ परिचर | (१-एस)४४००-७४४० ग्रेड वेतन १३०० | मुळ वेतन+महागाई भत्ता+इतर भत्ते | एकाकी पद |

विभाग – २ - गट -ड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मदतनीस | (१-एस) ४४४०-७४४० ग्रेड वेतन १,३००/- | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | एकाकी पद |
| २ | सफाई कामगार | (१-एस) ४४४०-७४४० ग्रेड वेतन १,३००/- | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | एकाकी पद |
| ३ | मैलमजूर | (१-एस) ४४४०-७४४० ग्रेड | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर | एकाकी पद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वेतन १,३००/- | भत्ते | |

विभाग – ३ - गट -ड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मदतनीस | (१-एस) ४४४०-७४४० ग्रेड वेतन १,३००/- | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | एकाकी पद |
| २ | सफाई कामगार | (१-एस) ४४४०-७४४० ग्रेड वेतन १,३००/- | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | एकाकी पद |
| ३ | मैलमजूर | (१-एस) ४४४०-७४४० ग्रेड वेतन १,३००/- | मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते | एकाकी पद |

**नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-**

उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक ) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

विहित वयोमर्यादेतील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

❖ **परिक्षेचे स्वरूप :-**

| अ.क्र. | पदनाम/संवर्ग | परिक्षेसाठीचे गूण |
|---|---|---|
| | | लेखी परिक्षा |
| | विभाग-१-गट-क | |
| १ | कनिष्ठ लिपीक | २०० |
| २ | सहाय्यक भांडारपाल | २०० |
| ३ | आरक्षण लिपीक | २०० |
| ४ | दूरध्वनी चालक | २०० |
| | विभाग-१-गट-ड | |
| १ | शिपाई | १०० |
| २ | टपाली | १०० |
| ३ | बंगला चौकीदार | १०० |
| ४ | कक्षसेवक | १०० |
| ५ | खानसामा | १०० |
| ६ | प्रयोगशाळा परिचर | १०० |
| | विभाग-२-गट-ड | |
| १ | मदतनीस | १०० |
| २ | सफाई कामगार | १०० |
| ३ | मैलमजूर | १०० |
| | विभाग-३-गट-ड | |
| १ | मदतनीस | १०० |

| | | |
|---|---|---|
| २ | सफाई कामगार | १०० |
| ३ | मैलमजूर | १०० |

टिप :- वरील सर्व पदांकरिता लेखीपरिक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी घेण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने एकाच

पदाचा अर्ज भरावा.

❖ परिक्षा शुल्क

| अ.क्र. | पदनाम/संवर्ग | खुला संवर्ग रुपये | राखीव प्रवर्ग रुपये |
|---|---|---|---|
| | विभाग-१-गट-क | | |
| १ | कनिष्ठ लिपीक | ३०० | १५० |
| २ | सहाय्यक भांडारपाल | ३०० | १५० |
| ३ | आरक्षण लिपीक | ३०० | १५० |
| ४ | दूरध्वनी चालक | ३०० | १५० |
| | विभाग-१-गट-ड | | |
| १ | शिपाई | ३०० | १५० |
| २ | टपाली | ३०० | १५० |
| ३ | बंगला चौकीदार | ३०० | १५० |
| ४ | कक्षसेवक | ३०० | १५० |
| ५ | खानसामा | ३०० | १५० |
| ६ | प्रयोगशाळा परिचर | ३०० | १५० |
| | विभाग-२-गट-ड | | |
| १ | मदतनीस | ३०० | १५० |
| २ | सफाई कामगार | ३०० | १५० |
| ३ | मैलमजूर | ३०० | १५० |
| | विभाग-२-गट-ड | | |
| १ | मदतनीस | ३०० | १५० |
| २ | सफाई कामगार | ३०० | १५० |
| ३ | मैलमजूर | ३०० | १५० |

टिप : १. माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे. माजी सैनिक उमेदवारांनी अन्य आरक्षणातून अर्ज सादर केल्यास

त्यांना परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

२. परिक्षा शुल्कचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

(१) शुल्क भरण्याकरिता मुखपृष्ठाच्या डाव्या भागाकडील ‘‘माझे खाते’’ या लिंकवर क्लिक करावे.

(२) ‘‘माझे खाते’’ या लिंकवर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादीशुल्क भरल्याच्या/ न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ‘Unpaid’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) ‘‘Pay Now’’ या लिंकवर क्लिक केल्यानंतर २ पर्याय उपलब्ध होतील. १) ऑनलाईन पेमेंट, २) चलनाद्वारे.

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाया चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या

कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(६) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासांनंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाया उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

३. वर दर्शविण्यांत आलेले परिक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.

४. स्टेट बँक ऑफ इंडीया कडून आकारले जाणारे प्रक्रिया शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

५. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक २९/०४/२०१५ ते दिनांक १४/०५/२०१५ पर्यंत अंतिम राहिल. त्यानंतर बँक लिंक बंद होईल. विहीत दिनांकानंतर परिक्षा शुल्क भरल्यास वैध (Valid) मानले जाणार नाही, तसेच परिक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

➢ लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रीकेचे स्वरुप व कार्यक्रम

१ गट क साठी लेखी परिक्षेची प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. (निगेटिव्ह) नकारात्मक गुणपध्दत (मार्क सिस्टिम) अवलंबली जाणार नाही.

२ गट क मधील कनिष्ठ लिपीक/सहाय्यक भांडारपाल/आरक्षण लिपीक/दुरध्वनी चालक या पदाकरिता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकुण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

३ गट क साठी शासन निर्णय दि. १९/१०/२००७ च्या आदेशातील नियम ५(१) नुसार उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड याद्या तयार करुन निवड यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. तसेच शासन निणर्य क्रं.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३ अ दि. २७/०६/२००८ मध्ये विर्निधिष्ठ केल्यानुसार उमेदवारांना समान गुण मिळाल्यास कोणती कार्य पध्दती अवलंबावी याबाबत सदरच्या आदेशात नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४ गट ड मधील शिपाई/चौकीदार/टपाली/बंगला चौकीदार/कक्षसेवक/खानसामा/प्रयोगशाळा परिचर/ मदतनीस/ सफाई कामगार/ मैलमजूर या पदांकरीता १०० गुणांची लेखी परिक्षा मराठी, अंकगणीत, सामान्य ज्ञान व बुध्दीमत्ता चाचणी यावर आधारीत असेल.

➢ <u>अर्ज करण्याची पध्दत :-</u>

१. प्रस्तुत पदांकरिता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यांत येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना (maharecruitment.mahaonline.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्याचे चलन २ प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत व बँकेची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहिल. सदरच्या २ प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडून परत मिळेल, त्यानुसार स्वतःची मूळ प्रत उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी घेतली जाणार नाही.

३. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा वापरातील ई-मेल आयडी आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वतःचा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

५. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

6. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी असल्यास कस्टमर केअर सेंटर भ्रमणध्वनी क्रमांक ०२२/६१३१६४०० व ई मेल व्दारे संपर्क साधण्यासाठी support@mahaonline.gov.in आणि suvidha. mahaonline.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

❖ <u>सर्वसाधारण सुचना :- (कार्यपद्धती,अटी व शर्ती)</u>

१. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची यादी, परिक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परिक्षाकेंद्र / बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरतीप्रकीये दरम्यान वेळोवेळ भेट देवून भरती प्रक्रीयेची माहिती कार्यक्रमाबाबतअद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करून घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

२. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

३. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवंलब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४. उमेदवारास लेखी परिक्षा व कागदपत्रे पडताळणी, इत्यादी करिता स्वखर्चाने यावे लागेल.

५. उमेदवारांनी यापूर्वी जरी त्याचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरी त्यांनी या पदांच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

६. उमेदवारास कार्बन प्रतीसहीत उत्तरपत्रिका परिक्षेच्यादिवशी देण्यात येणार आहे. उत्तरपत्रिकेची मूळ प्रत परिक्षा कालावधी संपलेवर परिक्षार्थीकडून हस्तगत केली जाईल.

७. संकेत स्थळावरुन उत्तरतालिका परिक्षा झालेल्या दिवसापासून ५ दिवसात प्रसिध्द केली जाईल. जेणेकरुन उमेदवारास स्वतःचे गुण काढता येतील.

८. उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांचे ओ.एम.आर.स्कॅनिंग द्वारे प्राप्त गुण वैयक्तीक रित्या पडताळता येण्याची सुविधा उक्त संकेतस्थळावर परिक्षेनंतर १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

९. लेखी परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेशपत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वतः डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

१०. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी

ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

❖ अंतिम निवड :-

१. पात्र उमेदवारांच्या अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.

अ) उमेदवाराची अंतिम निवड हि गट-क व गट-ड साठी लेखी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली

जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार त्यानंतर ..
२. मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनूसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९० -पूर्वीच्या २८ तत्सम जमाती ), भटक्या जमाती (धनगर व तत्सम ) इतर मागासवर्ग या क्रमाने त्यानंतर ..
३. अपंग कर्मचायांच्या नियुक्त्या करताना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.अपंग-१००९ / प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९ मार्च, २०१० मधील तरतूदीनुसार अपंगांची आरक्षित पदे सरळसेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात येऊन, अपंगाची पदे भरती करण्याची कार्यवाही करावी. मात्र निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामाऊन घ्यावे असे आदेश आहेत. त्यानुसार निवड अपंग उमेदवाराची निवड करण्यात येईल. त्यानंतर
४. माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर
५. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार
६. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल )
७. वरील प्रत्येक प्रवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

२. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे व शासन निर्णयाच्या अटीची संबंधीत नियुक्ती अधिका-यामार्फत (संबंधीत मंडळ अधीक्षक अभियंता ) तपासणी करुन पुर्तता झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

❖ विशेष सूचना :-

१. उमेदवाराने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात, परिक्षा केंद्रात, परिक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परिक्षेच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्टॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
२. गट क संवर्गातील कनिष्ठ लिपीक/सहाय्यक भांडारपाल/आरक्षण लिपीक/दूरध्वनी चालक तसेच गट-ड संवर्गामधील शिपाई/चौकीदार/टपाली/बंगला चौकीदार/कक्ष सेवक/खानसामा/प्रयोगशाळा परिचर/मदतनीस/सफाई कामगार/ मैलमजूर या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रत्नागिरी

सा.बां.मंडळ व रत्नागिरी मंडळ कार्यालयाचे अखत्यारीत रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सा.बां.विभाग चिपळूण/उत्तर रत्नागिरी/कुडाळ सा.बां.विभाग मु.कणकवली/ सावंतवाडी सा.बां.विभाग/ मार्ग प्रकल्प विभाग रत्नागिरी व त्यांचे अखत्यारीतील कोणत्याही उपविभागीय कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल. गट ड मधील मैलमजूर संवर्गातील अंतिम निवड केलेल्या उमेदवारांना या मंडळाचे अखत्यारीत असलेल्या विभागाकडील उपविभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांच्या व इमारतींच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी त्यांच्या सेवेचा वापर करण्यात येईल.

३. गट क या संवर्गातील बदल्या रत्नागिरी सा.बां.मंडळ व रत्नागिरी मंडळ कार्यालाचे अखत्यारीत सा.बां.विभाग चिपळूण/उत्तर रत्नागिरी/कुडाळ सा.बां.विभाग मु.कणकवली/ सावंतवाडी सा.बां.विभाग/ मार्ग प्रकल्प विभाग रत्नागिरी व त्यांचे अखत्यारीतील कोणत्याही उपविभागीय कार्यालयात कोठेही करण्यात येईल.

४. गट क संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रत्नागिरी सा.बां.मंडळ व रत्नागिरी मंडळ कार्यालाचे अखत्यारीत सा.बां.विभाग चिपळूण/उत्तर रत्नागिरी/कुडाळ सा.बां.विभाग मु.कणकवली/ सावंतवाडी सा.बां.विभाग/ मार्ग प्रकल्प विभाग रत्नागिरी व त्यांचे अखत्यारीतील कोणत्याही उपविभागीय कार्यालयातील ठिकाणी नियुक्ती दिली जाईल. रुजू झाल्यानंतर विहित केलेली खातेनिहाय / अन्य परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, त्याशिवाय त्यांची नियुक्ती नियमित समजली जाणार नाही.

५. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना,शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

६. शासकीय कर्मचा-यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम-२००५ मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२०१०/१०/१२ दिनांक ०३/०६/२०११ मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

७. शासन वित्तविभाग निर्णय क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. तथापी त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अशंराशिकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

८. शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८.०३.२००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक ०१.०७.२००५ नुसार विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शसनाने गट अ,ब,क व ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

९. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांने सहा महिन्याच्या आत वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

१०. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांची नेमणुक त्याचे पुर्वचरित्र व वर्तवणूक (पोलीस एन्कॉएरी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सेवेतुन काढून टाकण्यात येईल.

११. <u>मागासवर्गीय आरक्षण :-</u> विमुक्त जाती (अ), भटक्या जामती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१/०३/२०१४ नंतरचे प्रमाणपत्र ( Non Crimilayer Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

नियुक्तीनंतर ६ महिन्याचे आत जात पडताळणी प्रमाणपत्र विभागामार्फत सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१२. ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१३. खेळांडूसाठी आरक्षण :- फक्त अत्यूच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल केली आहे. संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालयाकडील प्रमाणपत्र अर्ज करण्यापूर्वीच प्रमाणित करुन घेण्यात यावीत.

१४. भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण :- हे आरक्षण गट क व गट ड च्या पदांना ते लागू आहे. सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१५. शासकीय व निमशासकीय कर्मचारी :- त्यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरावे. परवानगीची प्रत, कागदपत्रे छाननीच्यावेळी सादर करावी.

१६. महिलांसाठी आरक्षण :- आरक्षणाच्या मागणीसाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१/०३/२०१४ नंतरचे प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate ) कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावे.

१७. अंशकालीन उमेदवार :- सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर/पदवीधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक असून तशी नोंद ऑनलाईन अर्जात करावी. सदर प्रमाणपत्र व नोंदणीचे प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावे.

१८. माजी सैनिकांसाठी आरक्षण :- सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिक /राजाधिष्ठ अधिका-यांना सैन्यातील कालावधी अधिक तीन वर्षे इतकी कमाल वयाची सवलत नियुक्तीसाठी देण्यात येईल म्हणजेच त्यांच्या वयातून सैनिकी सेवेचा कालावधी कमी केल्यावर परिणामभूत वय हे विहित वयोमर्यादेपेक्षा तीन वर्षाहून अधिक असावे.

१९. पदभरतीच्या अधिसुचना, शासन निर्णय व परिपत्रके आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळवरून उमेदवाराने स्वतः उपलब्ध करून घ्यावीत.

जा.क्र.रमंर/आस्था-२/२१४७
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय
रत्नागिरी सा.बां.मंडळ, रत्नागिरी
बांधकाम भवन, नगर परिषदे समोर,
जयस्तंभ, रत्नागिरी ४१५६१२.
दिनांक २४/०४/२०१५.

सदस्य सचिव
तथा
कार्यकारी अभियंता,
मार्ग प्रकल्प विभाग, रत्नागिरी

प्रत :- उप सचिव आस्थापना सा.बां.विभाग मंत्रालय यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- मा.मुख्य अभियंता (सा.बां.) प्रादेशिक विभाग,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- अधीक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) मंडळ मुंबई व समन्वय अधीक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) परिमंडळ मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- अध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता रत्नागिरी सा.बां.मंडळ, रत्नागिरी यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- सदस्य सचिव, तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.उत्तर विभाग, रत्नागिरी/ सदस्य सचिव, तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.कुडाळ विभाग, मु.कणकवली यांना माहितीकरिता अग्रेषित.

प्रत : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग चिपळूण /सावंतवाडी/ मार्ग प्रकल्प विभाग रत्नागिरी यांना माहितीसाठी अग्रेषित.

प्रत : कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग दक्षिण विभाग, रत्नागिरी यांना माहितीसाठी अग्रेषित.

प्रत : उपविभागीय अभियंता यांना माहितीसाठी अग्रेषित.

२/- आपण सदर जाहिरात आपल्या कार्यालयातील जाहिरात फलकावर उपलब्ध करुन देणेची व्यवस्था करावी.

C:\Users\1188\Desktop\Advertisement 2014 saralsewa bharti.doc